# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**

## अधिसभा निवडणूकसाठी व्यवस्थापन प्रतिनिधी मतदारसंघाची दुरुस्त मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत

### जाहीर प्रकटन

**संदर्भ क्र. १ : साफुपुविनि/१९, दिनांक १८ जून, २०२२**
**संदर्भ क्र. २ : महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १(८)**
**संदर्भ क्र. ३ : साफुपुविनि/८५, दिनांक ०८ सप्टेंबर, २०२२**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(त)[(28(2)(p)] अन्वये संलग्न महाविद्यालये किंवा परिसंस्था यांच्या व्यवस्थापन गटाने त्यांच्यामधून व्यवस्थापनाचे सहा प्रतिनिधी अधिसभेवर (**Senate**) निवडून द्यावयाचे आहेत. याकरिता मतदार नोंदणी करण्यासाठी संदर्भ क्र. १ अन्वये ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. संदर्भ क्र. २ अनुसार तयार करण्यात आलेल्या व्यवस्थापन प्रतिनिधी मतदारसंघाची तात्पुरती मतदार यादी तसेच अपात्र ठरलेल्या अर्जांची यादी (कारणासहित) विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर संदर्भ क्र. ३ अन्वये प्रसिध्द केली होती. संदर्भ क्र. २ अनुसार तयार करण्यात आलेली व्यवस्थापन प्रतिनिधी मतदारसंघाची दुरुस्त मतदार यादी विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर दुरुस्त मतदार यादीमध्ये मा. कुलसचिव यांच्या निदर्शनास आणून दिलेल्या वगळलेल्या किंवा चुकीच्या नोंदीबाबतच्या हरकती विचारात घेण्यात आल्या आहेत. या हरकतींवरील निर्णयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ अनुसार प्रसिध्द करण्यात येत असलेल्या दुरुस्त मतदार यादीबाबतचे अपील सदर यादी प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत म्हणजेच **गुरुवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ ते सोमवार, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२२ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत** मा. कुलगुरु यांचेकडे आवश्यक कागदपत्रांसह समक्ष अथवा **puvc@unipune.ac.in** या ईमेल वर दाखल करण्यात यावे. तसेच त्याची प्रत विद्यापीठाच्या निवडणूक विभागास समक्ष सादर करण्यात यावी किंवा **election@unipune.ac.in** या ईमेल वर पाठविण्यात यावी. विहीत मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा / ई-मेलचा अथवा नव्याने करण्यात येणा-या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

(डॉ.प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/ ९८
दिनांक : २८ /०९/२०२२